ॐ

****************************************

# गीता-गीताई

***************************

मूळ संस्कृत गीता

व

विनोबांनी लिहिलेली गीताई

यांचे संकलन !

एकट्याने वा समूहाने अर्थपूर्णरितीने

म्हणण्यासाठी उपयुक्त !

संकलन

**ज्ञान प्रबोधिनी**

५१०, सदाशिव पेठ, पुणे – ४११०३०

## दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने

एक वर्षाच्या आत गीता-गीताईची पहिली आवृत्ती संपली अनेकांना गीता-गीताईची कल्पना आवडली. याचा प्रसार व्हावा, हजारो मुला-मुलींपर्यंत ती पोहोचावी अशी तीव्र इच्छा मनामध्ये होती. नाममात्र किंमतीमध्ये ती विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हावी यासाठी गीता-गीताईप्रेमी मंडळींनी आवश्यक ते अर्थसाहाय्य करण्याचे मान्य केले, काही शाळांनी उत्साहवर्धक प्रतिसाद दिला व परंधाम प्रकाशनातर्फे ही आवृत्ती छापण्यास मान्यता दिली, या सर्वांच्या सहकार्यामुळे दुसऱ्या आवृत्तीच्या छपाईला हुरूप आला. गीताईच्या अमृतमहोत्सवी वर्षामध्ये दुसरी आवृत्ती छापण्याचा योग येत आहे ही मोठी भाग्याची व आनंदाची गोष्ट आहे.

पहिल्या आवृत्तीत राहिलेल्या काही चुका व सलग म्हणता येण्यासाठी घातलेली भर यामुळे ही पुस्तिका अधिक अचूक व वापरण्यास उपयुक्त होईल असा वि  ास वाटतो.

बाजारू आकर्षणाच्या, भूलभुलैय्येच्या दुनियेत जीवनाच्या चिरंतन मूल्यांचा संस्कार विद्यार्थिदशेपासूनच व्हावा यासाठी, गीता-गीताईच्या अर्थपूर्ण पठणाचा उपयोग व्हावा ही प्रार्थना.

---

गीता-गीताईचे एकत्रित प्रकाशन सर्वप्रथम परंधाम प्रकाशनातर्फे झाले असून त्यांनी एका पानावर गीतेचे श्लोक व त्याच्या समोरील पानावर गीताईचे श्लोक याप्रमाणे आदरणीय विनोबांच्या सूचनांचे पालन करून ती छापली आहे. ती परंधाम प्रकाशन, पवनार, वर्धा येथे उपलब्ध आहे.

**प्रथम आवृत्ती** : सौर आषाढ शके १९२५,
(२००० प्रती) जुलै २००३.
**द्वितीय आवृत्ती** : सौर ज्येष्ठ शके १९२६,
(२००० प्रती) जून २००४.
**पुनर्मुद्रण–१** : सौर आषाढ शके १९२७,
(२००० प्रती) जून २००५
**पुनर्मुद्रण–२** : सौर आषाढ शके १९३१,
(२००० प्रती) जून २००९

---

सामूहिकरित्या नित्य पठण करणाऱ्यांसाठी,
गीता–गीताईप्रेमी मंडळींच्या अर्थसाहाय्यातून प्रकाशित
केलेली सवलतीच्या किंमतीतील प्रत
सवलत मूल्य रु.५/– मध्ये उपलब्ध आहे.
(किमान नोंदणी ५० प्रती)

---

**मूल्य - रु. १०/-**